# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### राज्यात बालविवाह प्रतिबंध कायद्यामध्ये सुधारणा करुन त्याची प्रभावीपणे अंमलबाजवणी करण्याबाबत

**(१) १४२०२ (२८-०६-२०२२) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.विलास पोतनीस, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दरवर्षी एक लाख बालविवाह होत असून गत तीन वर्षात १६ आदिवासी जिल्हयांत १५ हजार २५३ बालविवाह झाले असल्याची बाब दिनांक २६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बालविवाह रोखण्यासाठी सन २००६ मध्ये करण्यात आलेल्या बालविवाह प्रतिबंध कायद्यामध्ये नियमांच्या अभावामुळे त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने राज्यात बालविवाह रोखण्याबाबत तसेच बालविवाह प्रतिबंध कायद्याच्या नियमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१७-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

जनहित याचिका क्र.१३३/२००७ मध्ये दिनांक १४/०३/२०२२ रोजीच्या सुनावणीमध्ये बालमृत्यूचे बालविवाह हे महत्वाचे कारण असू शकते याची कारणमिंमासा करण्यासाठी १६ आदिवासी जिल्ह्यातील मागील ३ वर्षातील बालविवाहाचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुषंगाने मा.मुख्य सचिव व मा.ॲडव्होकेट जनरल यांचे निदेशाने करण्यात आलेल्या सर्वेक्षणात १५२५३ बालविवाह झाल्याचे नमूद केले आहे.
(२) हे खरे नाही.

बालविवाह रोखण्यासाठी केंद्र शासनाचा बाल विवाह प्रतिबंध अधिनियम २००६ कार्यान्वित असून राज्याने महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंध नियम २००८ तयार केले आहेत.

(३) बालविवाह रोखण्यासाठी राज्यात ग्रामसेवकांना व बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून नियुक्त केले असून त्यांना सहाय्य करण्यासाठी अंगणवाडी सेविका/पर्यवेक्षक यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. बाल विवाह प्रतिबंध अधिनियमाच्या अनुषंगाने ग्राम बाल संरक्षण समितीच्या भूमिकेबाबतची माहिती देण्याच्या अनुषंगाने ग्राम बाल संरक्षण समिती सदस्य सचिव अंगणवाडी सेविका आणि सदस्य पोलीस पाटील यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे. युनिसेफच्या सहकार्याने नागरी भागातील बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी यांचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आयटीआय) विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत

**(२) १४२१९ (२८-०६-२०२२) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.बाळाराम पाटील, श्री.कपिल पाटील, श्री.किशोर दराडे : दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ११ मधील प्रश्न क्रमांक १०३७२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आयटीआय) विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरू केली असून सदर प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थींना दर महा ४० रुपये विद्यावेतन दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विद्यावेतन मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना बँक खाते व उत्पनाचे दाखले काढण्यासाठी येणारा खर्च हा मिळणाऱ्या विद्यावेतनापेक्षा जास्त असून सदर विद्यावेतन तुटपुंजे असल्याने प्रशिक्षणार्थी व लोकप्रतिनिधी यांच्याकडून विद्यावेतनात वाढ करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आयटीआय) विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (२२-०८-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात रुपये ४०/- वरुन रुपये ५००/- वाढ करण्याबाबतच्या प्रस्तावावर विभागस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना १०, २०, ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर सातवा वेतन आयोगानुसार तीन लाभ मिळण्याबाबत

**(३) १४२४६ (२८-०६-२०२२) श्री.किशोर दराडे : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक २८९६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व शासकीय कर्मचारी यांना सातवा वेतन आयोगानुसार १० वर्षे, २० वर्षे व ३० वर्षा नंतर वेतनश्रेणी मंजूर केल्या असून खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना ही सुधारित वेतन श्रेणी मिळणेबाबत समिती स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी व्यवस्थापनामार्फत चालविण्यात येत असलेल्या सर्व प्राथमिक व उच्च माध्यमिक पर्यंतच्या एमसीव्हीसीच्या शिक्षकांचे वेतन १ तारखेला अदा करणेबाबत शासनाने आदेश निर्गमित केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षकांच्या वेतनासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद शासनाने अगोदरच केलेली असूनही वेतन १ तारखेला न झाल्याने शिक्षक संघटनांनी व लोकप्रतिनिधींकडून शासनास निवेदन सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने एमसीव्हीसी शिक्षकांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला अदा करण्याबाबत तसेच, सुधारित १० वर्षे, २० वर्षे व ३० वर्षानंतर वेतनश्रेणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१८-०८-२०२२) :** (१) हे खरे आहे.

याबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिनांक ३१/०७/२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.

(२) सर्व प्रादेशिक कार्यालयांना त्यांच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित संस्थामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना वेतन ०१ तारखेला नियमितपणे अदा करण्यात यावेत असे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्या स्तरावरून सूचना देण्यात आले आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सर्व प्रादेशिक कार्यालयांना त्यांच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित संस्थामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना वेतन ०१ तारखेला नियमितपणे अदा करण्यात यावेत असे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्या स्तरावरून वेळोवेळी सूचना देण्यात आले आहेत.

तसेच, संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचेकडून दिनांक २/३/२०२१ च्या पत्रान्वये अशासकीय अनुदानित उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम/ व्यवसाय अभ्यासक्रम व तंत्र माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचारी यांना ७ व्या वेतनआयोगानुसार सुधारित आश्वासित प्रगती योजना संपूर्ण सेवा कालावधीत १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेत लागू करणेबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला असून, सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## पंढरपूर तीर्थक्षेत्र आराखड्यातील अपूर्ण कामांबाबत

**(४) १४२७८ (०७-०७-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तीर्थक्षेत्र विकास आराखड्यानुसार पंढरपूर तीर्थक्षेत्र विकासातील १०० कामांसाठी ४७४ कोटी १३ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात अंतर्भूत असलेल्या १०० कामांपैकी माहे मे, २०२२ अखेर ५१ कामे पूर्ण करण्यात आली असून इतर कामे अपूर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील अपूर्ण कामे प्राधान्याने पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात अंतर्भूत असलेल्या १०० कामांपैकी माहे मे-२०२२ अखेर ५१ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. उर्वरित ४९ कामांची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे. :-

| | |
|---|---|
| प्रगती पथावरील कामे | १० |
| वगळलेली कामे | ३२ (काही कामे नगरपालिका निधीतून करण्यात आली आहेत, तर पालखीतळ भुसंपादन, रिंगण व शहरातील विकासकामे कामांची आवश्यकता नसल्याने वगळण्यात आली आहेत.) |
| अद्याप सुरु करावयाची कामे | ३ (निविदा स्तरावर)<br>४ (कामे सुरु करण्याच्या प्रक्रियेत) |

(३) सुरु असलेल्या कामापैकी जी कामे आषाढी वारी पूर्वी होणे शक्य होती ती पूर्ण करण्याचे निर्देश कार्यान्वयीन यंत्रणांना देण्यात आले होते. तसेच उर्वरित कामे डिसेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

(४) कोरोना कालावधीत कामे सुरु नसल्याने, सदरची कामे पूर्ण होण्यास विलंब झाला आहे.

---

## नळदुर्ग (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथील आपले घर बालगृह, या संस्थेचे थकीत अनुदान मिळण्याबाबत

**(५) १४३१० (२८-०६-२०२२) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नळदुर्ग (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथील आपले घर बालगृह, या संस्थेचे सन २०१०-२०११ ते सन २०१४-२०१५ या कालावधीतील प्रलंबित रुपये २५ लाखापेक्षा जास्त थकीत अनुदान मा.उच्च न्यायालयाचे सुस्पष्ट आदेश असताना मिळालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नळदुर्ग येथील आपले घर बालगृह, या संस्थेचे थकीत अनुदान मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१७-०८-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे,

मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र.१४१५४/२०२१ प्रकरणी मा.न्यायालयाने दिनांक १५/१२/२०२१ रोजी याचिकाकर्त्या संस्थेच्या गुणदोषांवर आधारीत कायदा/नियमानुसार निर्णय घेवून सन २०१०-११ ते सन २०१४-१५ या कालावधीतील रुपये २५,१२,६६५/- अनुदानाबाबत कार्यवाही करण्यासंदर्भात आदेशित केले आहे.
(२) सन २०१०-११ ते सन २०१४-१५ या कालावधीच्या थकित अनुदानाच्या अनुषंगाने वित्त विभागाच्या अधिकारी, सनदी लेखापाल आणि जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांचे तपासणी पथक गठीत करण्यात आले होते. सदर पथकाकडून आपले घर बालगृह, नळदुर्ग या संस्थेच्या अभिलेख्यांच्या तपासणीत त्रुटी आढळून आल्याने सन २०१०-११ ते सन २०१४-१५ या कालावधीतील अनुदान वितरीत न करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंगणवाडी सेविकांच्या विविध मागण्यांबाबत

**(६) १४३१२ (२८-०६-२०२२) श्री.कपिल पाटील, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १ लाख ८७ हजार अंगणवाडी सेविकांना मागील २ महिन्यांपासून मानधन मिळालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंगणवाडी सेविकांना पूर्व प्राथमिक शिक्षकांचा दर्जा देऊन वेतनश्रेणी लागू करावी, अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना आरोग्य कवच, माहे ऑगस्ट २०१९ ते मार्च, २०२२ या कालावधीतील प्रवास भत्ता, प्रत्येक महिन्याला मोबाईल रीचार्जचे पैसे मिळावेत, समान काम, समान वेतन तत्वावर सर्व अंगणवाडी शिक्षकांना समान वेतन मिळावे, टॅब, डी. टी. एड. धर्तीवर अंगणवाडी सेविकांना सेवांतर्गत प्रशिक्षण मिळावे, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ काम देऊन शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्याचा दर्जा द्यावा, भरतीतील निर्बंध उठविण्यात यावेत, अल्प उपस्थिती असलेल्या अंगणवाड्याचे एकत्रीकरण व्हावे, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना पाच हजार रुपये बोनस (भाऊबीज भेट) देण्यात यावा, कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या सेवा समाप्ती लाभामध्ये पाच लाख रुपये अंगणवाडी सेविका व तीन लाख रुपये

मदतनीस या तत्वानुसार सुधारणा करावी, सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू कराव्यात, भविष्य निर्वाह निधी योजना तसेच श्रावण बाळ पेन्शन योजना किंवा जेष्ठ नागरिक पेन्शन योजना लागू करावी व अन्य काही मागण्या शासनाकडे करुनही मागण्यांबाबत कोणतीच कार्यवाही झाली नसल्याने आंदोलन करण्याचा इशारा अंगणवाडी सेविका संघटनेने शासनाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अंगणवाडी सेविकांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत तसेच थकीत वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१७-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही,

राज्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांचे माहे जुलै, २०२२ पर्यंतचे मानधन केंद्र शासनाच्या PFMS प्रणाली व्दारे अदा करण्यात आले आहे.
(२) व (३) अंगणवाडी कर्मचारी संघटनेकडून अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला, ही बाब खरी आहे. संघटनेच्या कोणत्याही मागण्यांकडे दुर्लक्ष केले जात नाही. अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत वेळोवेळी बैठका आयोजित करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यात खाजगी लसीकरण केंद्राअभावी बुस्टर डोस मिळत नसल्याबाबत

**(७) १४३३२ (२८-०६-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वय वर्षे १८ ते ५९ या वयोगटातील व्यक्तींना कोरोना बुस्टर डोस खाजगी लसीकरण केंद्रावर घ्यावा लागणार असून त्यासाठी रुपये २५० ते ४०० प्रति डोस द्यावे लागणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यात २३ लाख व्यक्ती अजूनही बुस्टर डोस विनाच असून त्यासाठी अद्यापही जिल्ह्यात एकही खाजगी लसीकरण केंद्र नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सोलापूर जिल्ह्यात संबंधित व्यक्तींना संरक्षित डोस देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२२-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार १८ ते ५९ वर्षे वयोगटातील व्यक्ती कोरोना प्रिकॉशन डोस खाजगी लसीकरण केंद्रावर घेत आहेत व त्यासाठी रुपये ३८७/- इतके शुल्क आकारण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.

(३) सोलापूर जिल्ह्यात १२७ कोविड-१९ खाजगी लसीकरण केंद्रांना परवानगी देण्यात आली आहे.

दिनांक ३ जुलै, २०२२ अखेर सोलापूर जिल्ह्यातील १८ ते ५९ वर्षे वयोगटातील ७८८ व्यक्तींनी प्रिकॉशन डोस घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे एमआरआय मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत

**(८) १४३४२ (२८-०६-२०२२) डॉ.रणजित पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ११२९२ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे एमआरआय मशीन खरेदीकरीता ५ कोटी इतका निधी सिध्दीविनायक मंदिर ट्रस्टतर्फे यंत्राची प्रत्यक्षात खरेदी आदेशानंतर वितरीत करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धर्मदाय आयुक्त यांनी निधी देऊनसुद्धा एमआरआय मशीन खरेदी करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हाफकीन जीव औषध महामंडळामार्फत सदर यंत्राच्या खरेदीची सुरु असलेली निविदा प्रक्रिया पूर्ण करुन यंत्राच्या खरेदीचे आदेश पारीत करण्यात आले आहेत काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने अकोला वैद्यकीय महाविद्यालयासाठी एमआरआय मशीन खरेदी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२४-०८-२०२२) :** (१) होय.

(२) व (३) हाफकीन महामंडळ स्तरावर सदर मशीन खरेदीची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शेतमजुर, वाहनचालक, यंत्रमागधारक व ऊसतोड कामगारांसाठी महामंडळ स्थापन करण्याबाबत

**(९) १४३४९ (२८-०६-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ४ कोटीहून अधिक असंघटीत कामगार असून त्यांना कामगार म्हणून कोणतेही विशेष लाभ मिळत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येत्या वर्षभरात शेतमजुर, वाहनचालक, यंत्रमागधारक व ऊसतोड कामगार इत्यादी असंघटीत कामगारांसाठी महामंडळ स्थापन करण्याचे शासनाने जाहीर केले असल्याचे दिनांक २० एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने जाहीर केल्याप्रमाणे सदर महामंडळ स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१७-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.

बांधकाम कामगार, घरेलू कामगार, माथाडी कामगार, सुरक्षा रक्षक इ. असंघटीत कामगारांना विविध सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी स्वतंत्र मंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत. या मंडळांच्या माध्यमातून त्या त्या क्षेत्रातील असंघटीत कामगारांना विविध सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजनांचे लाभ देण्यात येतात.
(२) होय.
(३) शेतमजुर, वाहनचालक व यंत्रमाग कामगार यांच्यासाठी स्वतंत्र कल्याण मंडळे स्थापन करण्यासंदर्भात मंत्रिमंडळ प्रस्ताव सादर करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

ऊसतोड कामगारांसाठी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १३/०९/२०१९ च्या शासन निर्णयान्वये स्वतंत्र गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तद्नंतर विभागाच्या दिनांक २४/०२/२०२० च्या शासन निर्णयान्वये गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ व ऊसतोड कामगारांशी संबंधित विषय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे हस्तांतरीत केले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१०) १४३६३ (२८-०६-२०२२) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक १३५०९ ला दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संपूर्ण विदर्भासाठी महत्वकांक्षी असणाऱ्या वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचा प्रकल्प अहवाल तयार असून रुपये ७० हजार कोटींच्या निधीअभावी हे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विदर्भातील ६ जिल्ह्यातील १५ तालुक्यांना याचा लाभ होणार असून निधी देण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी शासनाला लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विदर्भातील महत्वाच्या असलेला वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-०८-२०२२) :** (१) नाही.

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचे प्रकल्प अहवाल तयार असून सद्य:स्थितीत राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक येथे तपासणीत आहे. राज्य तांत्रिक सल्लागार समिती व तदनंतर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यता प्राप्त झाल्यावर प्रशासकीय मान्यता देणे शक्य होणार आहे. सबब निधी अभावी काम प्रलंबित असल्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेच्या अनुषंगाने पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करणे, राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांची मान्यता व तदनंतर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांची मान्यता घेणे याबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतित आहे. उपरोक्त मान्यता प्राप्त झालेनंतर सदर प्रकल्पांस प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, इतर वैधानिक मान्यता प्राप्त करणे, निधी देणे इ. बाबत पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आशासेविका व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत

**(११) १४३६४ (२८-०६-२०२२) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना काळात काम करणाऱ्या आशासेविकांना राज्य शासनाने सन २०२१ पासून माहे मार्च, २०२२ पर्यंत रुपये ३००० प्रती महिना वाढीव मानधन त्याचप्रमाणे रुपये ५०० प्रोत्साहन भत्ता देण्याचे जाहीर केले असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आशासेविकांना मोबदला अदा करण्यासाठी किमान प्रशिक्षण पूर्ण झालेले असणे अनिवार्य असून ज्या आशासेविकांचे प्रशिक्षण पूर्ण झालेले नाही त्यांना कोणत्याच प्रकारचे मानधन देता येणार नाही अशा प्रकारचे परिपत्रक आरोग्य विभागाने जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोरोना काळात काम केलेल्या राज्यातील आशासेविकांना मानधनाऐवजी वेतनश्रेणी लागू करण्याबाबतची मागणी शासनाच्या विचाराधीन आहे काय, याबाबतचा तपशील काय आहे,
(४) असल्यास, सदर परिपत्रकामुळे कोरोना काळात काम केलेल्या सेविकांना शासनामार्फत दिले जाणारे वाढीव मानधन आणि प्रोत्साहन भत्ता याचप्रमाणे केंद्रामार्फत दिल्या जाणाऱ्या मानधनापासूनही वंचित रहावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आरोग्य विभागाने काढलेले परिपत्रक रद्द करुन कोरोना काळात काम केलेल्यांचे प्रलंबित मानधन वेळेत देण्याबाबत तसेच, आशासेविका, सुपरवायझर्स आणि अन्य आरोग्य कर्मचारी यांना शासकीय सेवेत नियमित करणे, आरोग्य सुविधा पुरविणे, किमान वेतन देणे, शासकीय कर्मचाऱ्यांच्या अटी, शर्ती व सवलती लागू करणे आदि मागण्यांबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १७ जुलै,२०२० च्या शासन निर्णयान्वये आशासेविकांना रुपये २,०००/- दरमहा मानधन देण्यात येत होते. त्यामध्ये, दिनांक ०९ सप्टेंबर, २०२१ च्या शासन निर्णयान्वये रुपये १,०००/- इतकी वाढ करण्यात आली आहे. तसेच कोरोना महामारी सुरु असे पर्यंत रुपये ५००/- इतका कोविड भत्ता देण्यात येत आहे. मात्र, दिनांक ०१ जुलै, २०२२ पूर्वी कोविडच्या अनुषंगाने साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती निवारण अधिनियम २००५ अंमलात असल्याचे रद्द झाल्यास व यासाठी देय असणारे रुपये ५००/- प्रतिमाह इतका मोबदला अदा करण्याचे बंद झाल्यास दिनांक ०१ जुलै, २०२२ पासून प्रतिमाह रुपये ५००/- एवढी वाढ करण्यास दिनांक ०९ सप्टेंबर, २०२१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे.

आशासेविकांचे किमान प्रशिक्षण पूर्ण झाले नसल्यास, त्यांना कोणत्याच प्रकारचे मानधन देता येणार नाही अशा सूचना दिनांक ०७ जुलै, २०२० पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.
(३) हे खरे नाही.

कोरोना काळात काम केलेल्या आशासेविका व अन्य कर्मचारी हे केवळ मानधनावर कार्यरत असल्याने त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) हे खरे नाही.
(५) कोरोना काळात काम केलेल्या आशासेविकांचे प्रलंबित मानधन अदा करण्याची कार्यवाही सूरु आहे. मात्र, कोरोना काळात कार्यरत असलेल्या आशासेविका, सुपरवायझर्स व अन्य आरोग्य कर्मचारी हे केवळ मानधनावर कार्यरत असल्याने त्यांना शासकीय सेवेत नियमित करणे आणि शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे अटी, शर्ती व सवलती लागू करणे शक्य नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील शाहिरांचे प्रलंबित मानधन सुरु करण्याबाबत

**(१२) १४३८९ (२८-०६-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील ६० वृध्द शाहिरांचे मानधनाचे प्रस्ताव समाजकल्याण विभागाकडे गत तीन वर्षापासून प्रलंबित असल्याचे दिनांक १ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात वृध्द कलावंतासह शाहिरांना मानधन देण्याबाबत स्थापन केलेल्या समितीकडून अर्जांचा पाठपुरावा केला जात नसल्यामुळे प्राप्त प्रस्तावांवर अद्यापही निर्णय झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने शाहिरांचे प्रलंबित मानधन सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (१२-०८-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) विभागाकडून सन २०१९ ते २०२१ या कालावधीतील २०० कलावंतांचे मानधन माहे एप्रिल, २०२२ मध्ये आहरीत केले होते. काही लाभार्थ्यांचे बँकेचा तपशील उशीरा प्राप्त झाल्याने दिनांक १ जुलै, २०२२ रोजी माहे जानेवारी ते मार्च, २०२२ या कालावधीचे मानधन कलावंतांच्या खात्यात जमा करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) पांगारेबुद्रुक धरणातून होत असलेली गळती थांबविण्याबाबत

**(१३) १४३९७ (२८-०६-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) पांगारेबुद्रुक धरणातून १४ गावांना तसेच धरणाखालील ४ गावांतील बारमाही शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी रुपये २५ कोटी निधीला प्रशासकीय मंजुरी दिल्यानंतर सन २००५ मध्ये सुरु करण्यात आलेले धरणाच्या उभारणीचे काम सन २०१० साली शंभर टक्के पूर्ण करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दहा वर्षापूर्वी ग्रामस्थांनी सदर धरणाच्या मुख्य सांडव्यामधून गळती होत असल्याचे लघुपाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आलेले असतानाही मुख्य सांडव्याला लागलेली गळती थांबविण्यासाठी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, धरणातुन होत असलेल्या गळतीमुळे धरणात २५ ते ३० टक्के पाणी शिल्लक असल्याने १४ गावांना नळपाणीपुरवठा योजनेद्वारे व धरणाखालील ४ गावांना बारमाही शेतीसाठी पाणीपुरवठा करता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने लघुपाटबंधारे विभागाकडून झालेल्या दुर्लक्षामुळे संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच, पांगारेबुद्रुक धरण सांडव्यामधील मुख्य दरवाजाला लागलेली गळती तसेच धरणाच्या मुख्य दरवाज्याला लागलेली गळती थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-०८-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

पांगरे बुद्रुक धरणाचे कार्यालयीन नाव चिंचवाडी लघु पाटबंधारे प्रकल्प असून सन २००५ मध्ये रुपये १७.९६ कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता मिळाली असून सन २००८ साली प्रत्यक्ष कामाला सुरवात झाली व धरणाचे बांधकाम काम सन २०१२ साली १०० टक्के पूर्ण झाले आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

धरणाचा मुख्य सांडवा द्वारविरहित असून सांडव्याला गळती लागलेली नाही. परंतु धरणाच्या मुख्य विमोचकाच्या विहिरीतील सेवाद्वाराच्या रबरसिल मधून अल्प प्रमाणात गळती होत आहे.

(३) जल जीवन मिशन अंतर्गत पांगरे बुद्रुक व १४ गावांसाठी रुपये २५.६५ कोटी इतक्या किंमतीच्या प्रादेशिक पाणी योजनेला महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने दिनांक ११ मे, २०२२ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. निविदा कार्यवाही पाणीपुरवठा विभागामार्फत सुरू आहे.

चिचंवाडी लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या कालव्याचे बंदिस्त नलिका प्रणालीचे काम प्रगतीपथावर असल्याने अद्यापपावेतो शेतीसाठी कालव्याद्वारे पाणीपुरवठा करण्यास सुरूवात झालेली नाही.

(४) चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

धरणाच्या सेवाद्वाराच्या रबरसिल मधून अल्पप्रमाणात होणारी गळती थांबविणेचे काम यांत्रिकी संघटनेच्या पाखरण कार्यक्रमामध्ये प्रस्तावित असून सन २०२२-२३ च्या प्रापण सुचीमध्ये सदर कामाचा समावेश करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यातील वृध्द साहित्यिक व कलावंत यांना मानधन मिळण्याबाबत

**(१४) १४४१८ (२८-०६-२०२२) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील वृध्द साहित्यिक व कलावंत यांचे मानधन योजनेचे गत तीन वर्षात ९२७ प्रस्ताव प्रलंबित असल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन समिती स्थापन झाल्यानंतर दोनशे प्रस्ताव प्राप्त झाले असून एका वर्षात १०० प्रकरणांचा कोटा जिल्ह्याला मंजूर असल्यामुळे वृध्द कलावंतांची प्रतिक्षा यादीत वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने अहमदनगर जिल्ह्यासाठी सदर योजनेचा कोटा वाढवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (१२-०८-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) प्रत्येक जिल्ह्यातील सन्मानार्थीची संख्या ६० वरुन १०० करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील नदीवरील पुलाचे व जोडरस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१५) १४४६५ (२८-०६-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील तिलारी मुख्य रस्ता ते पाळये रस्ता वाघेरी बंधारा येथे असलेल्या नदीवर जिल्हापरिषदेच्या बांधकाम विभागाने काही वर्षांपूर्वी बांधलेला पूल सन २०२१ च्या पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टीने नदीला आलेल्या पुरामुळे पुलाचा काही भाग व जोडरस्ता वाहून गेल्याने गावाचा दोन महिने अन्य भागाशी संपर्क तुटला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही वर्षांपूर्वी बांधलेला सदर पूल कमकुवत व धोकादायक झाल्याने या ठिकाणी नवीन पूल बांधण्यात यावा अशी मागणी मागील २ वर्षांपासून येथील ग्रामस्थांनी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, या पुलाची व जोड रस्त्याची बांधणी पूर निधीमधून करावी अशी मागणी येथील ग्रामस्थांनी मागील १० महिन्यांपासून मा.पालकमंत्री, मा.ग्रामविकासमंत्री, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग आदींकडे केलेली असतानाही त्याकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याने दिनांक २७ मे, २०२२ रोजी उपोषणास बसण्याचा इशारा श्री.संदेश वाघो नरक यांनी दिला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तिलारी मुख्य रस्ता ते पाळये रस्ता वाघेरी बंधारा येथे असलेल्या नदीवरील वाहून गेलेल्या पुलाचे व जोडरस्त्याचे काम अद्याप हाती न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने सदरहू पुलाचे व जोडरस्त्याच्या पुनर्बांधणीचे काम विनाविलंब हाती घेऊन पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१२-०८-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

सदरचा पूल सुमारे २५ वर्षापुर्वी बांधलेला असून पुल सुस्थितीत आहे. जुलै, २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये पुलाच्या एका बाजूच्या जोड रस्त्याच्या भरावाचा काही भाग वाहून गेला होता. त्यामुळे ४ ते ५ दिवस संपर्क तुटला होता असे जिल्हा परिषदेने कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) सदर पुलाच्या जोड रस्त्याचा काही भाग वाहून गेल्यानंतर ४ ते ५ दिवसात तात्पुरत्या स्वरुपात सुस्थितीत करण्यात आलेला आहे. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये तिलारी ते पाळये येथील पुलाच्या संरक्षक भिंतीकरीता रक्कम रुपये ७.७१ लक्ष निधी मंजूर करण्यात आलेला असल्याचे जिल्हा परिषदेने कळविले आहे

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपुर जिल्ह्यातील कार सिंचन प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(१६) १४५१४ (२८-०६-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपुर जिल्ह्यातील महत्वपूर्ण असलेल्या कार सिंचन प्रकल्पाचे बांधकाम गत ३५ वर्ष होऊनही अद्याप पूर्ण झालेले नसून नरखेड व काटोल तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतजमीन उपलब्ध होऊनही सिंचनाअभावी शेती करता आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार सिंचन प्रकल्पाचा बहुतांश भाग हा आदिवासी भाग असून लाभक्षेत्रात असलेली गावे ड्राय झोनमध्ये असूनही निधी अभावी उजव्या कालव्याचे १५ कि.मी. बांधकाम पूर्ण न झाल्यामुळे जलसेतुपर्यंत कार सिंचन प्रकल्पाचे पाणी पोहोचलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी क्षेत्रात सौरऊर्जेचा वापर करून उपसासिंचन पध्दतीने पाणी देण्याची योजना मंजूर करुनही या योजनेला सुरूवात झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने १५ कि.मी. कालव्याचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत विशेष आर्थिक तरतुद उपलब्ध करून शेतीच्या सिंचनाकरीता व गावातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कार प्रकल्पाद्वारे नागपूर जिल्ह्यामधील नरखेड तालुक्यामध्ये २१२५ हे. सिंचन क्षमता निर्मिती प्रस्तावित असून त्यापैकी १४४७ हे. सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. काटोल तालुक्यातील प्रकल्पाचा बुडीत क्षेत्रातुन उपसाद्वारे ११० हे. सिंचन करण्यात येते. नव्याने सौरऊर्जेसाठी ४८५ हे. सिंचन क्षेत्र काटोल तालुक्यात प्रस्तावित आहे. सिंचनासाठी आवश्यक इतर बांधकामे प्रगती पथावर आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

उजव्या कालव्याचे (लोहारी सावंगा वितरीका) ० ते ६.५१ कि.मी. व ८.०९ कि.मी. ते ८.४९ कि.मी. चे अस्तरीकरणाचे बांधकाम सुरु आहे. तसेच ६.५१ कि.मी. ते ८.०९० कि.मी. मधील जलसेतुचे काम पूर्ण झाले असून ८.४९ कि.मी. ते १५.९१० कि.मी. मधील अस्तरीकरणाचे काम निविदा प्रक्रियेत आहे. अस्तरीकरणाचे बांधकाम पूर्ण होताच शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळू शकेल.

(३) हे खरे नाही.

चतुर्थ सुप्रमा प्रस्तावात काटोल तालुक्यातील ७ गावांकरीता सौर ऊर्जा उपसा सिंचन योजनेला मान्यता असून सौर उर्जेचे प्राथमिक सर्वेक्षण पूर्ण झालेले आहे. प्राथमिक अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून नियामक मंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) उपरोक्त प्रकरणी नागपूर जिल्हातील उजव्या कालव्याचे (लोहारी सावंगा वितरीका) बांधकाम पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सन २०२२-२३ मध्ये या प्रकल्पावर रुपये १२.५० कोटीची तरतूद आहे. कालव्याचे १५ कि.मी. काम पूर्ण झाले असून अस्तरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच काटोल तालुक्यातील ७ गावा करीता

सौर ऊर्जा उपसा सिंचन योजनेचे सर्वेक्षण व आराखडा मंजूरीच्या विचाराधीन आहे. सदर योजनेवरून ४८५ हे. सिंचन क्षमता निर्मीत होणार आहे. सदर कामे पूर्ण होताच सिंचन क्षेत्र वाढणे अपेक्षित आहे. गावातील नागरीकांना पिण्याच्या पाण्याची सोय संबंधित ग्रामपंचायत मार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपुर जिल्ह्यातील रामटेक क्षेत्रातील विविध सिंचन प्रकल्पाला मंजुरी मिळण्याबाबत

**(१७) १४५१६ (२८-०६-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेक क्षेत्रातील खिंडसी पुरक कालवा, सालई मोकासा(लघु प्रकल्प) (ता.पारशिवनी, जि.नागपूर) सिहोरा कन्हान नदीवर प्रलंबित असलेले उपसा सिंचन प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत दोन वर्षापासून निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खिंडसी पुरक कालवा दायित्वाला प्राधान्य यादीत समाविष्ट करून परिपत्रक काढणे व उर्वरित कामाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी निधी मंजूर करण्याबाबत तसेच, सन २०१२ मध्ये सालई मोकासा लघु प्रकल्पाला प्रशासकीय मंजुरी मिळुनही तांत्रिक मंजुरी प्रदान करून सुधारित मंजुरी देणे तथा सिहोरा कन्हान नदीवर उपसा सिंचन जॅकवेल पंपहाऊस निर्माण करण्याची मागणी करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील सर्व बांधकामांना मंजुरी न मिळाल्यास दिनांक १ जून, २०२२ रोजी पासून लोकप्रतिनीधी यांनी आंदोलन करण्याची घोषणा केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने मागणी करण्यात आलेल्या सर्व प्रकल्पाच्या प्रलंबित कामांना मंजुरी प्रदान करून आर्थिक तरतुद उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, अंशत: खरे आहे.
खिंडसी पुरक कालवा :- पेंच प्रकल्पांतर्गत खिंडसी पुरक कालव्याचे सा.क्र. १५००मी. ते सा.क्र.१५३२० मी काम जवळजवळ ९२ टक्के पूर्ण झालेले आहे.

सदर काम पेंच या मोठ्या प्रकल्पांतर्गत समाविष्ट असून सदर कामामधील उर्वरीत कामे सुरु करण्याचे नियोजन आहे.

पेंच प्रकल्पाअंतर्गत खिंडसी पुरक कालव्याच्या प्रलंबित दायित्व मान्य करणेसाठी शासन निर्णय दिनांक २४/६/२०२१ मधील प्रकल्पांचे यादीत पेंच प्रकल्प समाविष्ट करणे साठीचा महामंडळाचा प्रस्ताव प्राप्त झालेला असून त्याबाबत कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीत आहे.

पेंच प्रकल्पाच्या दायित्व प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर करारनामा क्र.ब-१/३३/काअ/२००८-०९ अंतर्गत उर्वरित कामे करण्यात येतील.

सालई मोकासा लघु प्रकल्प :- सालई मोकासा लघु प्रकल्पास महामंडळाकडून २१/०७/२००८ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून प्रकल्पाची किंमत ६५९.५०६ लक्ष आहे. तथापि, ९.०० हे वनजमिनीला दिनांक १७/०२/२०२२ रोजी अंतिम मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुषंगाने संकल्पन मंजूरीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
कन्हान नदीवरील सिहोरा सिंचन योजना :- या योजनेंतर्गत जॅकवेल, पंप हाऊस, उर्ध्व नलिका, वितरण कुंड व मॅनिफोल्डच्या कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. तथापि, २०२२-२३ ची सामाईक दरसूची प्रकाशीत झाल्याने सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) पेंच प्रकल्पाअंतर्गत खिंडसी पुरक कालव्याच्या प्रलंबित दायित्व मान्य करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २४/६/२०२१ मधील प्रकल्पांच्या यादीत पेंच प्रकल्प समाविष्ट करणे साठीचा प्रस्ताव महामंडळाचे पत्र क्र.११७ दिनांक ०५/०१/२०२१ अन्वये शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार शासन स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

सन २०२२-२३ च्या वार्षिक नियोजनात पेंच प्रकल्प (एकत्रित ज्यात मूळ पेंच प्रकल्प, पेंच उच्च पातळी कालवा, खिंडसी पूरक कालवा अंतर्भूत आहेत) त्यासाठी रुपये २५.०० कोटी तरतूद आहे.

सालई मोकासा लघु प्रकल्प सन २०२२-२३ च्या वार्षिक नियोजनात प्राप्त तरतूद रुपये ०.१० लक्ष आहे.

सिहोरा उ.सि.यो. अंतर्गत कामाकरीता येणाऱ्या खर्चास (रुपये ६३.३२ कोटी) मदत व पुनर्वसन विभागाकडून निधी प्राप्त होईपर्यंत महामंडळाचे स्वनिधीमधून खर्च करण्यात यावा असे नियामक मंडळाच्या ८० व्या बैठकीत ठराव मंजूर करण्यात आलेले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोंदिया जिल्हा परिषदेच्या निविदेच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१८) १४५६६ (२८-०६-२०२२) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने गोंदिया जिल्हा परिषदेच्या रुपये १३ कोटींच्या निविदेला दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी स्थगिती दिली असतानाही गोंदिया जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रभारी कार्यकारी अभियंता यांनी निविदेतील कामे बॅकडेटने (पूर्वलक्षीप्रभावाने) नियमबाह्यरित्या देण्यात आल्याची तक्रार जिल्हा परिषद सदस्यांनी माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१७-०८-२०२२) :** (१) अशी तक्रार शासनाकडे प्राप्त झालेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचे विभागीय कार्यालय सुरु ठेवण्याबाबत

**(१९) १४६०२ (२८-०६-२०२२) श्री.अभिजित वंजारी : तारांकित प्रश्न क्रमांक १३५०९ ला दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पांच्या कामासाठी राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने सुरु केलेले नागपूरातील विभागीय कार्यालय अवघ्या ११ वर्षातच बंद करण्यात येत असल्याचे दिनांक १ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कार्यालयाला उपविभागीय कार्यालयाचा दर्जा देण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली असून हा नदीजोड प्रकल्प पूर्ण न होण्याची शक्यता निर्माण झाली असून सदर कार्यालय इतरत्र हलविण्यासंदर्भात विरोध होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने सुरु केलेले नागपूरातील विभागीय कार्यालय इतरत्र न हलविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.
नागपुर येथील विभागीय कार्यालय राष्ट्रीय जलविकास अभिकरण, हैदराबाद यांचे अंतर्गत येते. सदर विभागीय कार्यालय बंद करणेत येत असल्याबाबत राष्ट्रीय जलविकास अभिकरण, हैदराबाद/ नागपुर यांचेकडून शासनास कळविणेत आले नाही. विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाच्या कामासाठी राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने सुरू केलेले नागपुरातील विभागीय कार्यालय सद्य:स्थितीत सुरु आहे.
(२) शासनास अवगत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वंचित असलेल्या घरेलू कामगारांना आर्थिक मदत देण्याबाबत व संत जनाबाई सामाजिक सुरक्षा आणि कल्याण योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(२०) १४६५६ (२८-०६-२०२२) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक ८८६५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात घरकाम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षा आणि कल्याणासाठी शासनाने सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात "संत जनाबाई सामाजिक सुरक्षा व कल्याण योजना" या योजनेची मा.उपमुख्यमंत्री व मा.वित्त मंत्री यांनी सभागृहात घोषणा केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेकरीता रुपये २५० कोटी रकमेची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असताना या योजनेची अद्याप अंमलबजावणी झाली नसल्याचे दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोरोना-१९ महामारीकाळात शासनाने घरेलू कामगारांसाठी प्रत्येकी रुपये १५०० ची आर्थिक मदत दिली असता, घरकाम करणाऱ्या महिलांची एकूण संख्या पाहता त्यापैकी हजारो घरकामगार महिला आर्थिक लाभापासून वंचित राहिल्या असून घरेलू कामगार मंडळाने शिल्लक राहिलेला निधी शासनाकडे जमा केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोरोना काळातील आर्थिक मदतीपासून वंचित राहिलेल्या उर्वरित घरेलु कामगार महिलांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच "संत जनाबाई सामाजिक सुरक्षा आणि कल्याण योजना" या योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१७-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) संत जनाबाई सामाजिक सुरक्षा व कल्याण योजनेबाबत मंत्रिमंडळ प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र राज्य घरेलू कामगार कल्याण मंडळाकडे सक्रिय व जिवीत नोंदणी असलेल्या ६०,९२३ इतक्या पात्र घरेलू कामगारांना प्रत्येकी रुपये १५००/- इतके अर्थसहाय्य डी.बी.टी. व्दारे त्यांच्या खात्यात वाटप करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.